म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ६२३५.

IRBK-0106235
IRBK-0106235

ऐतिहासिक कथामाला : ११ :

# झांशीच्या राणीची कथा

वा. क्र. ६२३४
दि.
क्रमांक

लेखक :

रं. म. जोशी–निर्मळगुरुजी

★

किंमत ५० नये पैसे

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

# : अनुक्रम :

१. मनूचें बालपण .... .... ३
२. छोटी छबेली .... .... ५
३. बोल खरे झाले .... .... ७
४. घोड्यांची निवड .... .... ९
५. दत्तक घेतला .... .... ११
६. मला नको विलायती औषध .... १३
७. नहीं दूंगी मेरी झाँशी ! .... १५
८. झांशीवर चढाई .... .... १७
९. लढाई सुरू झाली .... .... १९
१०. राणी निसटली .... .... २१
११. पुण्याची पुण्याई .... .... २३
१२. मराठ्यांचा पाडाव .... .... २५
१३. स्फूर्ति मावळली.... .... .... २७
१४. .... आणि ज्योति जळाली .... २९
१५. अशी होती झांशीची राणी. ३१

☆

: मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक), चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

☆

आवृत्ति पहिली
मे १९५७

सर्वाधिकार
प्रकाशकाधीन

☆



## : १ : मनूचें बालपण

पेशवाई बुडाल्यानंतर दुसरे बाजीराव पेशवे गंगा नदीच्या कांठीं ब्रह्मावर्त येथें राहूं लागले. चिमाजीअप्पा पेशवे हे दुसऱ्या बाजीरावांचे बंधू होत. हे काशीक्षेत्रीं राहात होते. जेव्हां पेशवे महाराष्ट्र सोडून उत्तरेंत गेले तेव्हां त्यांच्याबरोबर महाराष्ट्रांतील अनेक कुटुंबें गेलीं.

मोरोपंत तांबे यांचें कुटुंब मूळचें सातारा जिल्ह्यांतील वाई या गांवीं राहणारें होतें. या कुटुंबांत मोरोपंत या नांवाचा एक पुरुष मोठा हुषार व खरेपणानें वागणारा असा निघाला. मोरोपंतांना चिमाजीअप्पा पेशवे यांनीं आश्रय दिला होता. चिमाजीअप्पा पेशवे जेव्हां काशीला गेले तेव्हां मोरोपंत तांबे यांचें कुटुंबहि काशीला गेलें. मोरोपंत हे पेशव्यांचे दिवाण म्हणून काम पाहात असत.

मोरोपंतांच्या पत्नीचें नांव भागीरथीबाई. भागीरथीबाई ह्या सुशील व प्रेमळ स्वभावाच्या होत्या. पहाटे उठायचें, गंगा

नदीवर जाऊन अंग धुवायचें, तुळशीची पूजा करायची, दुपारीं कथा व पुराण ऐकण्यांत आपला वेळ घालावयाचा. अशा रीतीनें त्यांचे दिवस सुखांत जात होते. त्यांतच भर म्हणून इ. स. १८३५ सालीं त्यांना एक कन्यारत्न झालें. तिचें नांव त्यांनीं 'मनू' असें ठेवलें.

मनू ही रूपानें सुंदर होती. ती मोठी पाणीदार व चलाख होती. मनूची आई भागीरथीबाई ह्या लवकरच वारल्या. त्यामुळें मोरोपंत तांबे यांना मनूचा फार लळा लागला.

मनू तीनचार वर्षांची झाली असेल, त्याच वेळीं चिमाजी-अप्पासाहेब पेशवे वारले. दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांनीं मोरोपंतांना ब्रह्मावर्त येथें राहाण्यास बोलाविलें.

ब्रह्मावर्त येथील पेशव्यांच्या राजवाड्यांत पेशव्यांचे नानासाहेब व नानासाहेबांचे चुलत भाऊ रावसाहेब हीं मुलें होतीं. मनू ही राजवाड्यांत येऊन या मुलांत खेळत असे. दुसऱ्या बाजीराव-साहेबांना तर ती फारच आवडत असे. चलाख स्वभावानें व अंगच्या प्रेमळपणानें ती सर्वांची आवडती झाली.



☆ ☆ ☆



## : २ : छोटी छबेली

दसऱ्याची मिरवणूक थाटानें चालली होती. ब्रह्मावर्तांचे रस्ते गर्दीनें फुलून गेले होते. गर्दींतून एक सुंदर मुलगी विजेसारखी धांवत आली.

" नाना, थांब ! नाना, थांब ! " ती ओरडत होती. श्रीमंतांचा हत्ती डौलानें पुढें चालला होता. धांवत धांवत मनू हत्तीपुढें गेली. तिनें हत्ती अडवला. अंबारींतून श्रीमंत आणि नानासाहेब पाहात होते.

" नाना, मला घे ना रे हत्तीवर ! मिरवूं दे मला थाटानें. " मनूचे शब्द नानानें ऐकले.

तो ऐटीनें तिला म्हणाला, " आज नाहीं तुला हत्तीवर घेणार. आज दसरा आहे. "

" माझा नाहीं का रे दसरा ? मला हत्तीवर घेतलंच पाहिजे. "

मनूच्या बोलण्याचें श्रीमंतांना कौतुक वाटलें—पण हत्ती पुढें चाललाच होता. मनू तशीच उभी होती !

"कोणाची हो ही धीट पोर ?" गर्दीत कोणीतरी कुजबुजलें.

"अहो, ही मोरोपंत तांब्यांची छोटी छबेली !" उत्तर मिळालें.

आतां हत्ती अगदीं जवळ आला.

मनू आतां चिरडली जाणार.

इतक्यांत मोरोपंत तांबे आले. त्यांनीं मनूचा दंड धरला. तिला खसकन् बाजूला ओढलें.

मनू ओरडत होती, " नाना, मला हत्तीवर घे ! "

" कार्टे, चूप बैस ! माझ्यावर श्रीमंतांचा राग होईल ! आपण गरीब, श्रीमंतांचे आश्रित. आपल्याला कसला हत्ती मिळणार ? वेडा हट्ट सोड ! " मोरोपंतांनीं मनूला खडसावलें; पण तिला चैन पडेना. ती रागानें लाल होऊन म्हणाली, " मिळतीलच मला हत्ती ! माझ्या दारांत असे एक दोनच काय, पण छप्पन्न हत्ती झुलतील !"

छोट्या छबेलीचे हे बोल ऐकून मोरोपंतांना फार कौतुक वाटलें. त्यांचा राग मावळला. त्यांनीं वर पाहिलें. देवाला हात जोडले. आणि डोळे मिटून ते पुटपुटले—

" माझी मनू भाग्याची लक्ष्मी होईल ! "

☆ ☆ ☆



## : ३ : बोल खरे झाले

झांशीच्या रस्त्यांतून वरात मिरवत होती. राजाचेंच लग्न ! मग काय थाट विचारतां ! झांशीचे राजे गंगाधरपंत नेवाळकर यांचें लग्न ! मोरोपंत तांबे यांची मनू आज राणी झाली. हिऱ्यामोत्यांनीं सजविलेल्या हत्तीवरून राजाराणींची वरात थाटानें मिरवली. हें कसें घडलें ?

मनू राणी कशी झाली ?

दसऱ्याच्या मिरवणुकींत मनूला श्रीमंतांच्या हत्तीवर बसूं दिलें नव्हतें. मनूचें मन देवानें जाणलें. दैवानें उचल खाल्ली. देवानें मनूचा हट्ट पुरविला.

झांशीचे राजज्योतिषी तात्या दीक्षित एकदां ब्रह्मावर्तांला आले होते. त्यांनीं मनूला पाहिलें. श्रीमंतांच्या मध्यस्थीनें मनूचें लग्न जुळविलें. तांब्यांची मनू झांशीची राणी झाली.


मनूचें नवें नांव ‘ लक्ष्मीबाई ’ असें ठेवण्यांत आलें. झांशींत खरोखरच लक्ष्मी अवतरली. तिच्या तेजानें झांशी दिपली. गंगाधरपंतांना आनंद झाला. मनूलाहि धन्यता वाटली.


“ आज मनूची आई जिवंत असती तर....! तिला किती किती आनंद झाला असता ! ”

मोरोपंतांनीं आपले अश्रु पुसले. त्यांनीं पुन्हां आकाशाकडे पाहिलें आणि मनांत प्रार्थना केली—“ तुझ्या लाडक्या मनूला आशीर्वाद दे ! ”

झांशीच्या राणीचा—आपल्या बालमैत्रिणीचा—मनूचा थाट पाहून श्रीमंत नानासाहेब पेशव्यांना फारच आनंद वाटला. झांशीच्या राणीनें त्यांना एक मोठा हत्ती सजवून भेट पाठविला. त्या वेळीं ते म्हणाले, “ मनू मोठी अभिमानी ! मागें ती म्हणाली होती छप्पन हत्ती माझ्या दारांत झुलतील ! ” खरोखरच तसें घडलें. तिचे बोल खरे झाले ! ”

☆ ☆ ☆





# : ४ : घोड्यांची निवड

मनू राणी झाली. तिच्या स्वभावाची पारख राजाला व प्रजेला हळूंहळूं झाली. ती सर्वांची आवडती झाली. राज्यकारभारांत राजाला राणीची फारच मदत होऊं लागली. राणीचा स्वभाव प्रेमळ आणि दयाळू; पण शिस्त फार कडक! कोणी हुकूम मोडला तर तिला मुळींच खपत नसे. गोरे इंग्रजसुद्धां तिचा दरारा मानीत. हुकमाला मान देत. राणीला माणसांची योग्य पारख होती. तिनें अधिकारावर लायक माणसें नेमलीं.

राणी झाल्यावरहि मनूनें आपला रोजचा व्यायाम मुळींच सोडला नाहीं. लहानपणीं नानांबरोबर मनूहि तरवार चालवी. दांडपट्टा खेळे, भाला फेंकणें. घोड्यावर रपेट करणें, वगैरे मैदानी व मर्दानी व्यायाम ती घेई. तोच नेम तिनें लग्नानंतरहि चालूं ठेवला.

ती रोज पहांटे लौकर उठे. स्नान, पूजा आटोपून तो व्यायाम घेई. पुरुषी पोषाख करी. घोडदौड करी. एक घोडा घामानें थबथबला

कीं दुसरा. अशा पांच घोड्यांची दौड ती करी ! तिला घोड्यांची पारख चांगलीच होती.

एकदां काय गंमत झाली. राजवाड्यांत एक सौदागर आला. त्यानें राजाला दोन उमदे घोडे दाखविले. ते त्यानें भेटच देण्याचें ठरविलें. पण अट घातली कीं, " या घोड्याची बरोबर किंमत मात्र सांगितली पाहिजे ! "

कोणालाहि नेमकी किंमत सांगतां येईना. मग राणी पुढें झाली. तिनें ते दोघे एकामागें एक मंडळावर धरले आणि लगेंच सांगितलें, " एक घोडा हजाराचा आणि हा दुसरा फक्त पन्नासाचा ! कारण हा दुसरा घोडा छातींत फुटला आहे तो आतां कामाला उपयोगी नाहीं. "

सौदागराला आनंद झाला. राणीनें या दोन्हीहि घोड्यांची पारख योग्य केली. सर्व लोकांना आश्चर्य वाटलें. महाराजांनीं राणीची तारीफ केली. राणीला माणसांची तशीच घोड्यांचीहि योग्य पारख करतां येत होती. नानासाहेब पेशवे आणि झांशीची राणी लक्ष्मीबाई हे दोघेंच त्या काळीं उत्तम अश्वपरीक्षक होते.

☆ ☆ ☆





## : ५ : दत्तक घेतला.

राणीचा संसार आनंदांत चालला होता. लौकरच त्या आनंदांत भर पडली. राणीला मुलगा झाला. झांशींत हत्तीवरून साखर वांटली. सारी प्रजा आनंदित झाली. ‘ मनू आई झाली !’ म्हणून मोरोपंतांचा आनंद गगनांत मावेना. बाळाच्या लीला पाहून आईला धन्यता वाटली.

तीन महिने झाले. बाळ आजारी पडला. अनेक औषधें दिलीं; पण हाय ! शेवटीं दुष्ट काळानें बाळ गिळला. आईचा सुखाचा ठेवा देवानें हिसकावून नेला. पाळणा सुना पडला. वंशाचा दिवा विझला. झांशीवर दुःखाचा डोंगर कोसळला. अश्रूंच्या नद्या वाहूं लागल्या.

मनू मानी होती, मर्दानी होती. ती कधीं रडली नव्हती. बाळाच्या मृत्यूमुळें ती ढसढसा रडली. ती आई होती. राणी लक्ष्मीचा धीर अश्रूंच्या पुरांत वाहून गेला.

गंगाधरपंत पुत्रशोकानें आजारी पडले. त्यांची प्रकृति ढासळूं लागली. ते अंथरुणाशीं खिळले. त्यांचाहि भरंवसा राहिला नाहीं. राणी चिंतेनें काळवंडून गेली.

आतां राजांनीं दत्तक घ्यावा असा सल्ला कारभाऱ्यांनीं दिला. मोरोपंतांनीं आग्रह केला. वंश चालूं राहिला पाहिजे. पंतांना तें पटलें. सर्वांना विचार पसंत पडला.

वासुदेवपंत नेवाळकर यांचा मुलगा आनंदराव हा दत्तक घेण्याचें ठरलें. मुहूर्त पाहिला आणि मोठ्या थाटामाटानें दत्तकविधान झालें. पंडित विनायकराव यांनीं यथासांग शास्त्रविधि केला. मुलाचें नांव " दामोदर " ठेवलें.

बुंदेलखंडाचे पोलिटिकल असिस्टंट मेजर एलिस हे समारंभास हजर होते. त्यांनीं कलकत्त्यास वरिष्ठाकडे या दत्तकवारसाचा रिपोर्ट केला आणि दत्तकाला मंजुरी मागविली.

आतां आपला वंश वाढेल या विचारानें राजा, राणी आणि प्रजा अशा सर्वांना आनंद झाला. आनंदरावानें आनंद केला. झांशीच्या गादीला वारस मिळाला. प्रजेला धीर आला. " दामोदर गंगाधर नेवाळकर " यांचा जयघोष मोठ्या थाटानें दरबारांत झाला.

☆ ☆ ☆



# : ६ : "मला नको विलायती औषध."

गंगाधररावांची प्रकृति सुधारली नाहीं. राजे हळूहळू खंगतच चालले. अनेक प्रकारचीं औषधें झालीं; पण गुण येईना. गणपती, महादेव वगैरे देवतांना जप–अभिषेक झाले. दानधर्म खूप केला. महालक्ष्मीपुढें अनुष्ठानें झालीं; पण राजांना बरें वाटेना. अशक्तपणा वाढत चालला. काळजी वाढूं लागली.

एके दिवशीं काय झालें—

महाराज बेशुद्ध पडले. उशाजवळ राणी बसली होती. कारभारी चिंता करीत बसले होते. राजवैद्यांनीं भारी मात्रा दिली. ते आपल्याकडून शिकस्त करीत होते.

एकजण हळूंच म्हणाला, " कलकत्त्याला कोणी एक प्रसिद्ध इंग्रज डॉक्टर आहे. त्यानें अनेक लोकांचे रोग बरे केले आहेत. तसाच एखादा गोरा इंग्रज डॉक्टर झांशीला घेऊन येऊं ! विलायती


औषधें फारच झटकन गुण देतात म्हणे. महाराजांसाठीं आतां तेंच औषध द्यावें !"

गंगाधरराव हळूहळू शुद्धीवर येत होते. त्यांनीं ही कुजबूज ऐकली. ते ताडकन् उठले आणि खाडकन् म्हणाले, "मला नको विलायती औषध ! मी देशीच औषध घेणार ! मला मरण आलें तरी चालेल. माझा देह मी भ्रष्ट होऊं देणार नाहीं. आपलीं देशी औषधें श्रेष्ठ आहेत. मी देशीच औषध घेणार !"

महाराजांचे बोल ऐकून सारेजण गप्प झाले. महाराज पुन्हां बेशुद्ध पडले. राजवैद्यांनीं त्यांना मग हेमगर्भाची मात्रा दिली. महाराजांनीं डोळे उघडले व राणीकडे डोळे भरून पाहिलें. त्या दोघांच्याहि डोळ्यांतून अश्रूंचा पूर वहात होता. ती शेवटचीच दृष्टिभेट ठरली. नंतर राजांनीं दामोदरास कवटाळलें आणि शेवटीं काळानें राजावर झडप घातली.

लक्ष्मीबाईवर वैधव्य कोसळलें. राणीनें हंबरडा फोडला. रडून रडून राणीचे अश्रू आटले. मोरोपंतांना अतिशय वाईट वाटलें. झांशी दुःखांत बुडाली.

☆ ☆ ☆



# : ७ : "नहीं दूँगी-मेरी झाँसी !"

राणी लक्ष्मीबाईवर आकाशाची कुऱ्हाड कोसळली. कमळाचें फूल कोमेजून गेलें ! पण तिनें धीर धरला. बाळ दामोदराच्या पुढील सुखासाठीं व झांशीच्या प्रजेच्या कल्याणासाठीं तिनें हिंमत धरली. दुःख गिळून ती आघात सोसूं लागली. ती वीरपत्नी होती. ती पुन्हां राज्याचा कारभार पाहूं लागली.

अगदीं साधी राहाणी, पूजा व दानधर्माचा नित्यनेम. रोजच्या व्यायामाचा तो सराव आणि प्रेमळ, दयाळू पण कडक शिस्तीचा कारभार हें सर्व तिनें चालूच ठेवलें. सर्वच लोकांना ती आदर्श माता म्हणून आदरणीय वाटूं लागली.

पण दुर्दैवाला हेंहि सहन झालें नाहीं. तें राणीच्या पाठीशीं हात धुऊन लागलें होतें. विधिघटनाच विलक्षण ! एके दिवशीं मेजर एलिस एक सरकारी खलिता घेऊन आला. कलकत्त्याचा इंग्रज सर्वाधिकारी लॉर्ड डलहौसी यानें तें फर्मान काढलें होतें. तो हुकूम असा होता—

" झांशीचा दत्तक वारस नामंजूर केला आहे.
झांशीचें राज्य खालसा करण्यांत आलें आहे.
झांशीचा ताबा राणीनें ताबडतोब इंग्रजांस
द्यावा."

लॉर्ड डलहौसीचा हा जाहीरनामा एलिसनें वाचून दाखविला.


लॉर्ड डलहौसी

तो ऐकून राणी रागानें लाल झाली. सिंहिणीसारखी चवताळून ती ओरडली, "मेरी झाँसी नहीं दूँगी! नहीं दूँगी मेरी झाँसी!"


नेहमीं शांत गंभीर दिसणाऱ्या राणीची ही गर्जना ऐकून एलिस सर्दच झाला. त्यानें नम्रतेनें विचारलें, "हाच जबाब वर कळवूं काय?"

राणी खवळून बोलली, "कळवा. हाच जबाब कळवा वर! घमेंड जिरलीच पाहिजे त्या गोऱ्या कंपनीची! या म्हणावं इथं चालून. या अबलेच्या तरवारीचं पाणी दाखवीनच म्हणावं! स्त्री असलें तरी भारतीय आहे. अन्याय सहन करणार नाहीं."

एलिस निघून गेला.

राणी गंगाधररावांच्या तसबिरीपुढें गेली. तिचा कंठ आतां भरून आला. आठवणी उफाळल्या. तिनें तरवार उपसली आणि वीर पवित्र्यांत उभी राहून पुन्हां आवेशानें आरोळी ठोकली, "नहीं! मैं नहीं दूँगी मेरी झाँसी!"

☆ ☆ ☆



# :८: झांशीवर चढाई

राणीचें उत्तर कलकत्त्याला पोंचलें. डलहौसीच्या रागाचा पारा चढला. मोठें सैन्य झांशीवर चालून आलें. राणीची तयारी म्हणावी तशी झाली नव्हती. चढाई झाली. नाइलाज झाला. झांशीवर इंग्रजांचा ताबा बसला. झांशीच्या किल्ल्यांत कडेकोट बंदोबस्त झाला.

शहरांतील एका राजवाड्यांत राणी राहूं लागली. राणीच्या अंगाची लाही होत होती. आग धुमसत होती. सिंहीण पिंजऱ्यांत कोंडली गेली होती. नाइलाज होता. फितुरीला ऊत आला होता. सर्वत्र अंधार झाला होता.

सत्तावन्न साल आलें. स्वातंत्र्यवीरांचा उठाव झाला. ठिणगी पडली. काळ्या पलटणी पेटल्या. वणवा पसरला. भारत गर्जना करूं लागला. त्या सिंहनादानें गोऱ्यांची गाळण उडाली. इंग्रजी सत्ता हादरली.

त्या क्रांतीची लाट झांशीला पोंचली. झांशी फुलून उठली. पलटणींत खुणेचें तांबडें कमल फूल फिरलें. गांवांतून भाकरी मिरवल्या. आगीचा डोंब उसळला, स्वातंत्र्ययज्ञांत कॅप्टन डनलाप, मेजर न्यूटन वगैरे गोऱ्यांची आहुति पडली. राणीनें इंग्रजांवर चढाई केली. झांशीचा ताबा मिळविला. किल्ल्यावर स्वातंत्र्याचा झेंडा डौलानें फडकला.

झांशीवर राणीचा अंमल सुरूं झाला. याच वेळीं पारोळ्याचे जहागीरदार झांशीवर हक्क सांगूं लागले. इंग्रजांनीं त्यांना लाथाडलें होतें. संधि साधून पारोळेकरांनीं झांशीवर चढाई केली, पण बाईनें त्यांना खडे चारले. ओर्च्छाचा नथेखाँ पठाण याचीहि राणीनें तीच गति केली. राणीचें राज्य म्हणजे सिंहिणीची गुहा होती.

राणीनें झांशीवर पुन्हां ताबा मिळविला. ही गोष्ट इंग्रजांना खपली नाहीं. ती बंडखोर आहे. वेळींच तिला नाहींसें केलें पाहिजे म्हणून ब्रह्मदेशाहून मोठी गोरी फौज आली. बंडखोराचा पराभव करीत ती सेना झांशीवर चढाई करण्यास सज्ज झाली.

☆ ☆ ☆





## :९: लढाई सुरू झाली !

इंग्लंडहून खासा सेनापति सर ह्यू रोज मुंबईस आला. त्यानें निजाम, शिंदे, होळकर वगैरेंच्या काळ्या पलटणी घेतल्या. फंदफितुरीची कमाल केली. कांट्यानेंच कांटा काढण्याची योजना केली. तो वायुवेगानें झांशीवर उतरला. सेनापति ह्यू रोज म्हणजे कर्दनकाळच होता.


तात्या टोपे

राणी लक्ष्मीबाई त्या धूर्त शकुनीचा डाव ओळखून होती. तिला भावी संकटांची पूर्ण जाणीव होती. तिनें तात्या टोपे वगैरे श्रेष्ठ क्रांतिवीरांशीं संधान बांधलें होतें. झांशीचा कडेकोट बंदोबस्त केला होता. ती युद्धास सज्ज होती.

लढाई सुरूं झाली. झांशीच्या किल्ल्यावरून प्रचंड तोफा भवानीशंकर, कडकबिजली, धनगडी,

नालदार वगैरे अग्निदेवता इंग्रजी फौजांवर आग ओकीत होत्या. चौफेर मारा चालूं होता.

हिकमती ह्यू रोजनें प्रथम झांशी गांव जाळलें. प्रचंड विध्वंस केला. जनतेची धूळधाण केली. राणीचा जीव त्यामुळें कळवळला. राणी संतापली. तिनें घनघोर युद्ध केलें. असे आठ दिवस गेले. रणचंडीनें तेथें थैमान मांडलें !

इंग्रजांच्या सुरुंगानें पडलेला तट राणीनें रात्रींतून बांधला. फितुरीनें दगा दिला. किल्ल्यांतील दारूचें कोठार भस्म झालें. पुंजी संपली. राणीच्या काळजाचें पाणी झालें.

तात्या टोपे बावीस हजार फौजेसह राणीच्या मदतीस आला. पण इंग्रजांनीं त्याला दूर गांठून पळवून लावला. राणीला मदत मिळाली नाहीं. ती असहाय्य झाली.

मर्दानी पोषाखांत राणी तटावरून फिरत होती. ती आपल्या सैन्याला धीर देत होती. घनगर्ज तोफेच्या मारानें इंग्रज घायाळ झाले होते. पण फितुरीनें पुन्हां नाश केला.

इंग्रजांनीं तटावरून किल्ल्यांत प्रवेश मिळाविला. राणीच्या सैन्याचा धीर खचला. इंग्रजांनीं संहाराची कमाल केली. राणीचे गोलंदाज कापले गेले. कचाकचीनें रक्ताचे पूर वाहूं लागले. वीरांचीं शिरकमळें अस्मानांतून गिरक्या घेऊं लागलीं. झांशीचें रणकंदन अति भयंकर झालें. राणी लक्ष्मीच्या शौर्यापुढें विजयश्रीहि लाजली !

☆ ☆ ☆



## : १० : राणी निसटली.

काळोख्या रात्रीची भयाण शांतता पसरली होती. राणी लक्ष्मीबाई एकटीच विचार करीत होती. झांशीच्या आवडत्या प्रजेचे हाल तिनें उघडया डोळ्यांनीं पाहिले होते! ते भीषण अत्याचार पाहून तिच्या काळजाच्या ठिकऱ्या उडाल्या होत्या. संतापाच्या ज्वालावर तिनें अश्रूंचा पाऊस पाडला. पण आग भडकली. राणी बेचैन झाली. ती मनाशीं म्हणाली,

"केवळ माझ्याचमुळें हें सारें घडलें! इतक्या लोकांचे बळी देऊन मी झांशिवर राज्य करूं? केवढा हा अघोरी हट्ट! हाय! नको नको! झांशी कोणाचीहि होवो. ती सुखी असो हीच इच्छा!"

एका वृद्ध कारभाऱ्यानें सल्ला दिला, "ही वेळ हट्टाची नाहीं! झाली एवढी आहुति तूर्त पुरे झाली."

"झांशी जळाली. मग मी तरी कां जगूं? पण छे. मला मरतांच येणार नाहीं. पुन्हां स्वातंत्र्य मिळवीन आणि झांशी सुखी करीन!

मला जगलेंच पाहिजे! येथून निसटलेंच पाहिजे! नानासाहेब पेशव्यांचें साह्य घेईन. इंग्रजांची सत्ता घालवून देईन....मग मरेन!"



नानासाहेब पेशवे

राणीनें लगेच मर्दानी पोषाख केला. दामोदर पाठीशीं बांधला. पांढरा घोडा सज्ज केला. घळघळत्या नेत्रांनीं तिनें झांशीचा निरोप घेतला आणि तटावरून घोडा फेंकला! आकाशांतून वीज चमकली. राणी निसटली. इंग्रजांचा कडेकोट पहारा युक्तीनें चुकवून फळी फोडून राणी निसटली.

राणी निसटली ही गोष्ट फुटली. खूप धांवपळ झाली. ह्यू रोजनें मोरोपंत तांब्यांना घायाळ केलें. जखमी पंतांना त्यांनीं फांशी दिलें. पंतांच्या डोळ्यांपुढें मनूचा आयुष्यपट सरकला. "माझी मनू भाग्यलक्ष्मी आहे. ती शत्रूच्या हातीं सांपडली नाहीं. छान झालें. राणी निसटली. राणीचा त्यागच भारताला स्वातंत्र्य मिळवून देईल!" फासांवर चढतांना पंतांनीं हे उद्गार काढले आणि आनंदानें मरण पत्करलें.

☆ ☆ ☆



# : ११ : पुण्याची पुण्याई

राणी झांशीहून निसटली. इंग्रजांनीं तिचा पाठलाग केला. काल्पीच्या रस्त्यावर इंग्रजांच्या तुकडीनें राणीला गांठलें; पण राणीनें घोड्याला गिरकी दिली आणि ती सारी तुकडी आपल्या समशेरीनें कापून काढली.

मग राणी काल्पीला पोंचली. रावसाहेब पेशवे तेथें होते. त्यांनीं नवल केलें—"चोवीस तासांत एकशें दोन मैल अंतर घोड्यावर तोडणारी अजब घोडदौड आहे ! बेजोड शौर्य आहे हें !"

बहिणभावांची भेट झाली. तात्या टोपेहि तेथें भेटले. अनेक क्रांतिवीर मिळाले. पुढील योजना ठरल्या. तयारी झाली. पण इंग्रजांचें बलिष्ठ व शिस्तबद्ध सैन्य त्यांच्या पाठीशीं अगदीं हात धुऊन लागलें होतें. कूंच, दर्यापूर आणि काल्पी येथें सर ह्यू रोज याचाच विजय झाला. जेथें तेथें त्या धूर्त रोजचाच विजय ! ता. २४ मे

१८५८ रोजीं काल्पी पडल्यावर रावसाहेब व राणी लक्ष्मीबाई ग्वाल्हेर येथें आले. त्यांना वाटलें शिंदे साहाय्य देतील, पण—

शिंदे जे पेशव्यांना भेटले ते सैन्यासह आणि तोफांसह भेटले. पुन्हां आपल्याच लोकांशीं युद्धाचा प्रसंग आला; पण महाराष्ट्रीय बाणा—जावळीचे मोरे शिवाजीनें नाहीं का ठार केले ? तीच गत या शिंद्यांची झाली. स्वातंत्र्यासाठीं शत्रूच्या गोटांतील आपले शिंदे नाहींसे करायचेच ! या विचारानें त्या क्रांतिवीरांनीं शिंद्यांशीं झुंज दिली.

क्रांतिवीरांच्या शौर्यापुढें शिंदे हरले. ते जीव घेऊन पळत सुटले. ते इंग्रजांच्या आश्रयासाठीं आग्र्याला पळाले. मग क्रांतिकारकांचे नेते स्वातंत्र्यवीर पेशवे ग्वाल्हेरांत आले. तेथें किल्ल्यांत तात्या टोपे यांना अगणित संपत्ति मिळाली.

श्रीमंत रावसाहेब पेशवे यांना ग्वाल्हेरांत थाटानें राज्याभिषेक करण्यांत आला आणि महाराष्ट्राचें स्वातंत्र्य पुन्हां स्थापलें गेलें. ता. ३ जूनला ती घटना घडली. थाटाचा दरबार भरला. श्रीमंतांनीं तात्या टोपे यांना महाराष्ट्राचे सरसेनापति नेमलें. श्री. रामराव गोविंद हे मुख्य प्रधान झाले. ग्वाल्हेरांत मराठ्यांची स्वतंत्र गादी ! पेशव्यांचें राज्य ! पुण्याची पुण्याई फळाला आली.

☆ ☆ ☆



# : १२ : मराठ्यांचा पाडाव

" ग्वाल्हेरांत पेशव्यांचें राज्य !" ह्यू रोजला बातमी कळाली. त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. त्याची चिंता वाढली. महाराष्ट्राच्या मानी मराठ्यांची मर्दुमकी तो ओळखून होता. केवळ फंदाफितुरीनेंच क्रांतिकारकांचा नाश करतां येईल हें तो जाणून होता. नाहींतर मराठे म्हणजे मरतील तेंव्हांच हटतील. वांचतील तर आणखी लढतील !

ह्यू रोजनें कलकत्त्याला तार केली. उलट तारेनें हुकूम आला, " मराठे नेस्तनाबूद करा, बंडखोर धुळीला मिळवा." लगेच निवडक गोरें सैन्य घेऊन ह्यू रोज ग्वाल्हेरवर आला. मोठ्या दुर्बिणीनें त्यानें प्रदेशाचें निरीक्षण केलें आणि मार्‍याच्या जागांवर मोर्चे बांधले. तयारी जय्यत केली.

ग्वाल्हेरच्या प्रजेसाठीं फतवा काढला कीं, “ शिंदे सरकारांना परत त्यांची मूळची गादी देऊं या ! पेशव्यांना हुसकून लावण्यासाठींच मी लढत आहे. आपल्या धन्यासाठीं मला जनतेनें मदत करावी. ”

या फसव्या फतव्याला लोक भुलले. फूट पडली. इंग्रजांचा कावा यशस्वी झाला. ग्वाल्हेरची प्रजा आतां पेशव्यांवर उलटली. तात्या टोपे निराश झाले.

धीर धरून राणीनें युद्ध चालविलें. तिनें मर्दानी पोषाख केला. ती स्वतः सैन्याच्या हालचाली करूं लागली. तिनें प्रयत्नांची कमाल केली. शिकस्तीचे डावपेंच केले. राणीच्या तोफांच्या मारापुढें इंग्रजांना पळतां भुई थोडी झाली. गोळ्यांचा वर्षाव, तलवारींचा खणखणाट आणि चोहोंकडे लढाईची धुमश्चक्री चालली.

पण दुसरे दिवशीं पारडें फिरलें. गोरी फौज राणीवर तुटून पडली. घनघोर युद्ध झालें. मराठी सैन्याची पूर्ण दाणादाण उडाली. ग्वाल्हेरच्या रस्त्यारस्त्यांतून प्रेतांचा खच पडला ! रक्ताचे पाट वाहूं लागले. क्रूरपणा आणि अत्याचार यांचा कळस झाला. क्रांतिकारकांचें सैन्य पळून गेलें. पेशव्यांचा पाडाव झाला. शेवटीं ग्वाल्हेर इंग्रजांच्या हातीं पडलें आणि किल्ल्यावर युनियन जॅक डौलानें फडकूं लागलें.

☆ ☆ ☆



## : १३ : स्फूर्ति मावळली....

ग्वाल्हेर पडलें. श्रीमंत पळाले. तात्या टोपे निसटले. राणी वेढ्यांत सांपडली. विचाराला वेळ नव्हता. रणकंदन चालूं होतें. शौर्याची शर्थ झाली. सूर्यप्रकाशांत विजा तळपत होत्या.

राणीनें फळी फोडली. घोडा भरधांव फेकला. राणी निसटली. दासी मुंदर तिच्या पाठोपाठ गेली. चारपांच क्रांतिवीर राणीच्या मागोमाग गेले. खिंडार पडलें. वेढा पांगला. गोरी फौज शिकारी कुत्र्यांप्रमाणें राणीच्या मागें धांवली. पाठलाग सुरूं झाला.

सूर्य अस्ताला चालला. पांखरें घरट्यांकडे पळालीं. अंधार डोकावूं लागला. क्रांतिवीरांचे घोडे दौडत होते. “ मेलें ऽ बाईसाहेब, मेलें ऽ ऽ ” मुंदरनें किंकाळी फोडली. राणीनें ती ऐकली. घोडा परतविला. मुंदरजवळ त्या आल्या. मुंदर गोळी लागून पडली होती.


राणीनें मुंदरचें मस्तक मांडीवर घेतलें. राणीच्या डोळ्यांतून आंसवांची माळ ओघळत होती. दाटलेल्या कंठांतून करुणस्वरानें

राणी म्हणाली, " मुंदर मुंदर, काय ग झालें हें ! बाळपणापासून तूं माझी सोबत केलीस. झांशीला माझी पाठराखीण म्हणून आलीस. आतां का तूं माझ्यापुढें निघून जाणार ? ऊठ मुंदर ! जिवाभावाच्या या तुझ्या मैत्रिणीला एकटी सोडूं नकोस ! तुझ्याच शौर्यामुळें मला धीर येत होता. तूं स्त्रियांचें सैन्य उभारलेंस. भारतीय महिलांचा गौरव वाढविलास. थोर कार्य केलेंस. हाय रे दुर्दैवा ! माझी मुंदर चालली........स्फूर्ति मावळली. "

घायाळ मुंदरला बोलवत नव्हतें. तिचा प्राण कुडींतून निसटत होता. क्षीण आवाजांत ती म्हणाली, " बाईसाहेब, शोक करीत बसण्याची ही वेळ नाहीं. वेडी माया सोडा. जा तुम्ही अगोदर ! पळा ! लांडगे पाठीशीं आहेत. दूर जा हो लौकर ! पुढील जन्मीं भेटूं आणि अपुरें काम पूर्ण करूं ! "

मुंदरनें राणीस नमस्कार केला. तिचा हात लुळा पडला. मुंदरनें मान टाकली. राणीनें हंबरडा फोडला आणि लगेच घोड्यावर मांड ठोकून राणी निसटली.

☆ ☆ ☆



# : १४ : ....आणि ज्योति जळाली.

राणीचा घोडा भरधांव पळत होता. पाठलाग जोरानें चालला होता. रस्त्यांत ओढा भरून चालला होता. राणीच्या घोड्याला तो ओलांडतां येईना. घोड्यानें तोंड मागें फिरविलें आणि राणीचें दैवहि फिरलें.

गोरी फौज येऊन भिडली. हातघाईची लढाई झाली. राणी एकटी पडली. शत्रूचा घाव राणीच्या चेहेऱ्यावर लागला. राणी रक्तानें न्हाली. राणीला भयंकर त्वेष चढला. तिनें पराक्रमाची शर्थ केली. पण शेवटीं राणी धाडकन् जमिनीवर पडली. तिला ग्लानि आली.

रामचंद्रराव देशमुख राणीजवळ आले. ते शोक करूं लागले. त्यांना राणी म्हणाली, " माझी शेवटची व्यवस्था करा. माझा देह शत्रूच्या हातीं पडूं देऊं नका. "

जवळच गंगादासबुवांची झोंपडी होती. देशमुखांनीं राणीला तेथें नेलें. बुवांनीं राणीला पाणी पाजलें. राणीला थोडी हुषारी आली. मालवतांना ज्योति मोठी झाली होती. राणीनें दामोदराच्या तोंडावरून

हात फिरविला. आपल्या त्या छोट्या मुलाला तिनें डोळा भरून पाहिलें आणि मग तिनें प्राण सोडला.

ती थोर क्रांतिदेवता पाहून तेथील पाषाणांनाहि पाझर फुटला. गंगादासबुवांनीं व देशमुखांनीं राणीचा देह उचलला; गवताच्या गंजींत ठेवला आणि अग्नि दिला.

भारताच्या स्वातंत्र्याची ज्योति अग्नीच्या ज्योतींत जळाली आणि भोंवतालीं पवित्र प्रकाश पसरला.

ग्वालेरला त्याच ठिकाणीं झांशीच्या त्या तेजस्वी राणीची समाधि आहे. आतां तेथें वृंदावन उभारलें आहे. आपणहि त्या स्थानापुढें हात जोडून मस्तक लववूं या.

दिव्यत्वाची जेथ प्रचीति ।
तेथें कर माझे जुळती ॥

☆ ☆ ☆



IRBK-0106235